**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें साप्ताहिक.

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.

*वर्गणीचे दर :*

वार्षिक : ६ रु. सहामाही : ३ रु.

किरकोळ अंक : ४ आ.

*जाहिरातीचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातखात्याकडून मागवाव्यात.

चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

" अर्थ "

" दुर्गाधिवास " पुणें ४.

REGISTERED No. B. 3434

# अर्थ

वर्ष १५ पुणें, बुधवार तारीख ६ जुलै, १९४९ अंक २७


दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लिं.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापना: १९२६.

मुख्य कचेरी :

सर वर्डसुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : **BANKOP** फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | १,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई–फोर्ट- --) मुंबई–मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रक ‹‹च व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत रे.. डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

उत्पादकांच्या सहकारी सोसायट्यांनीं तयार केलेला

## ग्रामोद्योगाचा माल खरेदी करा.

ह्या मालाची किंमत माफक असून, तो मजबूत व टिकाऊ आहे.

टोप्यांचें लायनिंग, चप्पल, कातडीं, हातमागावरील व पॉवरलूमवरील कापड, नक्षीदार व कलात्मक वस्तू, इत्यादींसाठीं चौकशी करा:—

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

तार : SAHYOG फोन : ३४५१९

औद्योगिक सहकारावरील आमचीं प्रकाशनें

(१) ऑर्गनायझेशन ऑफ इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज (ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु. ८ आ.)

(२) इंडस्ट्रिअल कोऑपरेशन (ले.:–जे. बी. टेलर, किं. १ रु.)

(३) कोऑपरेटिव्ह मॅनेजमेंट (ले :–. रेवि ॲले, किं. २ रु.)

(४) इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज अँड व्हिलेज. इंडस्ट्रीज इन बॉंबे प्रॉव्हिन्स (ले.:– एल. एन. रेणु, किं. १ रु. ४ आ.)

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** बुधवार चौक, पुणें






## सर्व प्रसिद्ध माल

भिंतीला लावण्याचे रंग, छापण्याची शाई,
एनॅमलचे कच्चे व पक्के रंग

केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें २ | केळकर बंधू, (शाखा) मेनरोड, नाशिक.

(आमचेकडे निरनिराळ्या एजन्सीज घेतल्या जातात व आमच्या सुमारें १०० वर उपविक्रेत्यांमार्फत मालाचा प्रसार केला जातो.)


# विविध माहिती

**नोटा लांबविण्याची अजब युक्ती**—हिंदी संघराज्यांतून पाकिस्तानांत चलनी नोटा नेण्यासाठी एक अजब युक्ती सरहद्दीवरील सेल्दा स्टेशनवर कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना आढळून आली. पूर्व पाकिस्तानांत जाणाऱ्या एका प्रवाशानें माशाचें पोट चिरून त्यामध्यें २,५०० रुपयांच्या नोटा ठेवल्या आणि परत पोट बेमालूम शिवून टाकलें. माशाचा आकार जरा मोठा वाटल्यामुळें अधिकाऱ्यांना शंका आली व त्यांनीं मासा फाडला. पोटांत २,५०० रुपयांच्या हिंदी चलनी नोटा आढळून आल्या. पाकिस्तांनांत जातांना कायद्याप्रमाणें कोणालाही ५० रुपयांपेक्षा अधिक नोटा बरोबर घेऊन जातां येत नाहींत.

**नवीं पोस्ट ऑफिसें**—हिंदचे दळणवळणमंत्री श्री. रफी अहमद किदवाई ह्यांनी नुकतीच अशी माहिती सांगितली कीं ह्या वर्षी खेडेगांवांतून ३,००० नवीं पोष्ट ऑफिसें उघडण्याचें सरकारनें ठरविलें होतें. त्यांपैकीं १,५०० आतांपर्यंत उघडण्यांत आलीं आहेत. आसामांत आणि पश्चिम बंगालमध्यें कांहीं भागांतून पोष्ट ऑफिसेंच नाहींत; तथापि लवकरच ह्याही भागांतून तीं उघडण्यांत येणार आहेत. खेडेगांवांतून उघडण्यांत आलेलीं सर्वच पोष्ट ऑफिसें आर्थिक दृष्ट्या अद्याप स्वयंपूर्ण नाहींत. तीं चालू ठेवण्याकरितां सरकारला खर्च येतो.

**पाकिस्तानसाठी अन्नधान्य**—आंतरराष्ट्रीय अन्नसमितीनें पाकिस्तानसाठी ३३,००० टन तांदूळ मंजूर केला आहे. त्यापैकीं २०,००० टन तांदूळ ब्रम्हदेशकडून, ८,००० टन इटलीकडून आणि ५,००० टन इजिप्तकडून देवविण्यांत येणार आहे.

**सहकारी संस्थेला कर्ज**—१९४७ सालीं पुणें जिल्ह्यांतील भोगडेवाडी आणि कात्रज ह्या गांवांतील घरें आगीच्या भक्ष्यस्थानीं पडलीं होतीं. ह्या गांवांतील घरें पुन्हां बांधण्यासाठी भिलारवाडी कोऑपरेटिव्ह रीकन्स्ट्रक्शन सोसायटी स्थापन करण्यांत आली आहे. ह्या सहकारी संस्थेला मुंबई सरकारनें १६,६६० रुपयांपर्यंत कर्ज मंजूर केलें आहे.

**मुंबईंत बेकारांची संख्या वाढूं लागली**—मुंबईंतील बेकारी वाढत चालल्याचें दिसून येत आहे. मुंबईंतील केंद्रांत रोज ५०० ते ६०० बेकार लोक आपलीं नांवें नोंदवीत आहेत. गेल्या फेब्रुआरींत ७,२०१ लोकांनीं आपलीं नांवें नोंदविलीं होतीं; मे मध्यें नांवें नोंदणारांची संख्या ११,१७९ पर्यंत आली होती. व्यापारी आणि औद्योगिक संस्थांनीं नोकरांच्या संख्येंत केलेली कपात, लोकसंख्येची वाढ आणि निर्वासितांची गर्दी ह्या कारणांमुळें बेकारी वाढल्याचें समजतें.

**सर्वांत अधिक चहा कोण घेतो?**—गेल्या महायुद्धापासून चहा पिणाऱ्या राष्ट्रांत ब्रिटननें पहिला नंबर पटकाविला आहे. ब्रिटनची लोकसंख्या लक्षांत घेतां ही गोष्ट नजरेंत भरण्यासारखी आहे. कारण, चीनची लोकसंख्या ब्रिटनच्या जवळ जवळ सहापट असतां चीनमधील नागरीक दरवर्षी अवघा १·५ पौंड चहा घेतो. युद्धापूर्वी ब्रिटन जगांतील चहाच्या निर्यातीपैकीं ५० टक्के चहा घेत असे. इंग्लंडच्या खालोखाल चहा घेणाऱ्या राष्ट्रांत ऑस्ट्रेलिआ आणि न्यूझीलंड ह्यांचे नंबर लागतात. अमेरिकेंत चहा फारसा खपत नाहीं. अमेरिका चहाची आयात बरीच करते; परंतु दर माणशीं दरवर्षी खप मात्र अर्ध्या पौंडपेक्षा अधिक नाहीं.

**पाकिस्तानमधील कापडाची पहिली गिरणी**—पाकिस्तानमधील कापडाच्या पहिल्या गिरणीच्या उभारणीचें काम आता संपत आलें आहे. यंत्र-सामुग्री बसविण्यांत आली असून गिरणींतील सूत कांतण्याच्या खात्याच्या कामाला लवकरच प्रारंभ होईल असें समजतें.

**अमेरिकेंतील बेकारी**—अमेरिकेंत सध्या बेकारीची लाट उसळली आहे. कॉंग्रेस ऑफ इंडस्ट्रिअल ऑर्गनायझेशन ह्या मजूर संघटनेच्या अध्यक्षांनीं संघटनेच्या स्थानिक शाखांना असा आदेश दिला आहे कीं, त्यांनीं अमेरिकन कॉंग्रेसमधील आपल्या प्रतिनिधींना, बेकारीला आळा घालण्याविषयीं तावडतोब कृति करण्याची विनंति करावी. गेल्या वर्षांत अमेरिकेंतील बेकारांची संख्या ५० टक्क्यांनीं वाढली असून त्यांत आणखी भर पडत आहे असें संघटनेच्या अध्यक्षांचें मत आहे.

**दहा हजार मजूर बेकार**—राजस्थानांतील कोटा, बिलवारा आणि किशनगड येथील कापडाच्या गिरण्यांच्या मालकांनीं टाळेबंदी केल्यामुळें १०,००० मजूर बेकार झाले आहेत असें समजतें. कापडाचे सांठे पडून असल्यामुळें गिरणी-मालकांनीं टाळेबंदी केली आहे.

**काश्मीरला कागदाचा पुरवठा**—काश्मीरमधील शाळांसाठीं पाठ्यपुस्तकें छापण्याकरितां म्हणून हिंद सरकारनें काश्मीरला ४८,००० टन कागद पुरविला आहे. डिसेंबर १९४८ पासून काश्मीर संस्थानच्या सरकारनें १,००,००० पुस्तकें छापलीं. आणखी २,००,००० पुस्तकें छापण्यात येत आहे.

**मध्यप्रांतांत किमान वेतनासंबंधीं बोर्ड**—१९४८ च्या किमान वेतनाच्या कायद्याला अनुसरून मध्यप्रांत सरकारनें प्रांतांतील किरकोळ उद्योगधंद्यांत गुंतलेल्या मजुरांचें किमान वेतन ठरविण्यासाठी एक ‘वेज बोर्ड’ नेमलें आहे.

**अमेरिकेचें औद्योगिकरण आणि बँका**—अमेरिकेच्या टेनेसी व्हॅली धरणाचे अध्यक्ष मि. मॉर्गन ह्यांचें सिमल्याला नुकतेंच एक भाषण झालें. त्यांनीं आपल्या भाषणांत कॅनडा आणि अमेरिका येथील बँकांच्या धंद्याची माहिती सांगितली. अमेरिकेच्या त्वरित झालेल्या औद्योगीकरणांत सर्व देशभर पसरलेल्या छोट्या बँकांचें बरेंच श्रेय आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थानांतील धरणांच्या योजनांसंबंधीं त्यांनीं असें मत व्यक्त केलें कीं, धरणांच्या योजना आणि छोट्या प्रमाणावरील ठिकठिकाणीं पसरलेले उद्योगधंदे ह्यांचा मेळ घातला गेला पाहिजे. ज्या धरणांची प्रेरक शक्ति पुढील पांच वर्षांच्या काळांत वापरतां येणार नाहीं अशी फार मोठीं धरणें बांधण्याविरुद्ध त्यांनीं इशारा दिला.

बेडेकर पापड वापरा

# अर्थ

बुधवार, ता. ६ जुलै १९४९





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## हिंदुस्थानाचें जकातविषयक संरक्षक धोरण

### फिस्कल कमिशनची प्रश्नपत्रिका

हिंदुस्थानाचें जकात विषयक धोरण योग्य प्रकारें आखण्यासाठी सरकारनें नेमलेल्या फिस्कल कमिशननें आपली १०४ प्रश्नांची पत्रिका प्रसिद्ध केली आहे. पत्रिकेचे दोन भाग आहेत. त्यापैकी दुसऱ्या भागांत हॅवाना चार्टरमुळें निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा मुख्यतः समावेश असून पहिल्या भागांत १९२२ पासूनची बदलती आर्थिक परिस्थिति, परराष्ट्रीय व्यापार, साम्राज्यांतर्गत जकाती, इत्यादि विषयक प्रश्न आहेत. पहिल्या भागांत आठ उपभाग आहेत. त्यांतील अनुक्रमानें विषयवारी खालीलप्रमाणें आहे. (१) १९२१ च्या फिस्कल कमिशननें शिफारसी केल्या, तेव्हांपासून देशांतील औद्योगिक व शेतीविषयक बदललेली परिस्थिति; मोठ्या कारखान्यांशीं तुलना करतां ग्रामोद्योगांची सद्यःस्थिति; शेतीच्या धंद्याची उभारणी. (२) संरक्षणाच्या धोरणाची व त्यांत झालेल्या सुधारणांची अंमलबजावणी. (३) भांडवल, उत्पादन, कामगार, चालकांस सुटणारा नफा, इत्यादि बाबत कांहीं प्रमुख उद्योगधंद्यांचा तपशील. (४) नव्या जकातविषयक धोरणाची आखणी करतांना विचारांत घ्यावयाच्या बाबी; हिंदच्या परराष्ट्रीय व्यापारांत झालेला बदल; आयात–निर्गतीवरील सरकारी बंधनें; उद्योगधंदे भरभराटीस आणण्याचे कामीं जकाती व इतर प्रकारचें सहाय्य ह्यांचें तौलनिक महत्त्व; संरक्षण व मदत कोणत्या तत्त्वांवर व अटींवर द्यावें. (५) कच्च्या मालाचा पुरवठा, तंत्रज्ञांचा पुरवठा, वहातुक, भांडवल, इत्यादींचे बाबतींत सरकार कसें सहाय्य करूं शकेल. (६) साम्राज्यांतर्गत देशांस जकातींत सवलती आणि इंपीरिअल प्रेफरन्स; हॅवाना चार्टरमधील समाविष्ट बाबी. (७) ज्यांना संरक्षण द्यावयाचें त्यांचेवर किंमती, मजुरी, मजुरांची सर्वसाधारण परिस्थिति, संशोधन, यांत्रिक व उत्पादनविषयक सुधारणा, मालाचा दर्जा एकच प्रकारचा उच्च राखणें, इत्यादि बाबत घालावयाचीं बंधनें. (८) संरक्षक जकातींच्या व इतर मार्गांनीं द्यावयाच्या प्रत्यक्ष मदतीविषयक तपशीलाच्या बाबी.

वरील त्रोटक माहितीवरून, फिस्कल कमिशनकडे सोपविलेलें काम किती महत्त्वाचें व व्यापक आहे, हें लक्षांत येईल. संरक्षक धोरणाची अंमलबजावणी १९२२ सालीं सुरू झाली, तेव्हांपासून आतांपर्यंतचा तिचा आढावा येथें दिला, तर तो नव्या फिस्कल कमिशनच्या कार्याची पार्श्वभूमि समजण्यास उपयुक्त होईल.

### १९२२ च्या इंडियन फिस्कल कमिशनच्या शिफारसी

इंडियन फिस्कल कमिशननें १९२२ सालीं संरक्षणाचें धोरण आखलें, तेव्हां उद्योगधंद्यांची तर वाढ व्हावी, परंतु गिऱ्हाइकावर मात्र अवास्तव बोजा पडूं नये, अशा रीतीनें संरक्षणास पात्र उद्योगधंद्यांची निवड करावी, असें सुचविलें होतें. संरक्षण मागणारे उद्योगधंदे खालील तीन कसोट्यांस उतरले पाहिजेत, असा कमिशनचा आग्रह होताः—(१) त्याला नैसर्गिक परिस्थिति (कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा, स्वस्त प्रेरक शक्ति, कामगारांचा पुरेसा पुरवठा व स्वदेशांत मोठी बाजारपेठ) अनुकूल पाहिजे. (२) संरक्षण दिलें नाहीं, तर तो उद्योगधंदा वाढीस लागणारच नाहीं किंवा देशाच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक त्या गतीनें वाढणार नाहीं, अशी स्थिति पाहिजे. (३) कालांतरानें संरक्षण काढून घेतल्यावर, त्या उद्योगधंद्यास जागतिक स्पर्धेस तोंड देतां आलें पाहिजे. रेल्वेचे दर अनुकूल असावेत, किनाऱ्यालगतच्या समुद्रवहातुकीचे दर उतरविले जावे, परदेशी माल येथें नुकसानकारक किंमतीस मुद्दाम ओतण्यांत येऊं नये, इत्यादि शिफारशीहि कमिशननें करून एक कायम स्वरूपाचें टॅरिफ बोर्ड नेमण्यांत यावें, असेंहि त्यानें सुचविलें.

### १९२२–३९ ह्या मुदतीमधील संरक्षण

हिंदुस्थान सरकारनें कमिशनच्या प्रमुख शिफारसी मान्य केल्या, परंतु कायम स्वरूपाचें टॅरिफ बोर्ड न नेमतां, वेळोवेळ जरूरीप्रमाणें टॅरिफ बोर्डांची नेमणूक केली. १९२३ सालीं पहिल्या टॅरिफ बोर्डाची नेमणूक झाली. त्याचेकडे पोलादाच्या धंद्याच्या संरक्षणाचा प्रश्न सोपविण्यांत आला. कै. प्रो. वा. गो. काळे हे ह्या बोर्डाचे सभासद होते. १९२४ ते १९३९ ह्या दरम्यान एकूण ५० अर्ज टॅरिफ बोर्डाकडे सोपविण्यांत आले, त्यापैकी कांहीं नव्या संरक्षणासाठी होते तर कांहीं आधी दिलेलें संरक्षण चालू ठेवण्यासाठी होते. १९३९ सालीं खालील आठ धंद्यांना संरक्षणाचा लाभ मिळत होताः—

| | |
|---|---|
| (१) लोखंड–पोलाद | (२) कपास कापड |
| (३) साखर | (४) कागद |
| (५) मॅग्नेशियम क्लोराइड | (६) रेशीम |
| (७) जरतार | (८) कृत्रिम रेशीम इ. |

प्रोटेक्टिव्ह ड्यूटीज कंटिन्यूशन ॲक्टान्वयें ह्या उद्योगधंद्यांचें संरक्षण चालू ठेवण्यांत आलें. टॅरिफ बोर्डांच्या शिफारशीस अनुसरून, १९४७ सालीं लोखंड-पोलाद, कपास कापड आणि कागद ह्या धंद्यांचें संरक्षण काढून घेण्यांत आलें. १९४९ सालीं जरतार, मॅग्नेशियम क्लोराइड ह्यांचेंहि संरक्षण असेंच काढून घेण्यांत आलें. १९३९ पूर्वी संरक्षित उद्योगधंद्यांच्या यादींत असलेल्यापैकी फक्त रेशीम, कृत्रिम रेशीम आणि साखर हे धंदे अद्याप त्या यादींत कायम आहेत.

### सेफगार्डिंग ऑफ इंडस्ट्रीज ॲक्ट, १९३३

परदेशांतून, विशेषतः जपानमधून, येणाऱ्या अत्यंत स्वस्त मालाच्या स्पर्धेपासून बचाव व्हावा ह्या दृष्टीनें कित्येक लहान उद्योगधंद्यांनीं १९३२–३३ मध्यें सरकारकडे मदतीची मागणी केली. तिला अनुसरून लेजिस्लेटिव्ह असेंब्लीनें वरील कायदा केला. देशांत मूळ धरलेल्या उद्योगधंद्यांना मारक होईल अशा रीतीनें परदेशी आयात होत असल्यास तिचेवर जादा जकात बसविण्याचा अधिकार ह्या कायद्यानें गव्हर्नर जनरल-इन-कौन्सिलला दिला. तथापि, हिंदुस्थान व जपान ह्यांचेमध्यें एक व्यापारी करार अस्तित्वांत होता त्यांतील मूलभूत गोष्टींस प्रस्तुत कायदा अनुसरून नव्हता, असें निदर्शनास आल्यामुळें त्याची अंमलबजावणी होऊं शकली नाहीं. म्हणून

सरकारनें इंडियन टॅरिफ अमेंडमेंट ॲक्ट, १९३४ हा कायदा पास करून घेऊन, भरमसाट स्वस्त आयात होणाऱ्या मालावर त्याच्या किंमतीवर एवजीं ऐनजिनसी जकात बसाविण्याचें ठरविलें. येन ह्या जपानी चलनाची किंमत उतरण्यापूर्वीची, योग्य स्पर्धेची परिस्थिति निर्माण करण्याइतपतच ह्या ऐनाजिनसी जकातींचा उपयोग करण्यांत आला.

### युद्धकालीन उद्योगधंदे

युद्धकाळांत आयात बंद झाली आणि हिंदुस्थानांत कित्येक नवे उद्योगधंदे निघाले. युद्धकाळांत स्थापन झालेले धंदे योग्य प्रकारें चालविण्यांत आले, तर त्यांना जरूर तेव्हां संरक्षण दिलें जाईल, असें व्यापारमंत्र्यांनीं १९४० सालीं असेंब्लींत आश्वासन दिलें होतेंच. एप्रिल, १९४५ मध्यें हिंदुस्थान सरकारनें आपलें औद्योगिक धोरण जाहीर केलें आणि लागलींच दोन वर्षांसाठी एका टॅरिफ बोर्डाची नेमणूक करून त्याचेकडे युद्धकालीन उद्योगधंद्यांच्या संरक्षणाच्या अर्जांचा विचार सोपविला. (१) उद्योगधंदा काटेकोरपणें, व्यापारी दृष्टीनें चालविला जात आहे आणि (२ अ) त्याची नैसर्गिक व आर्थिक अनुकूलता लक्षांत घेतां तो योग्य काळांत पुरेसा वाढून सरकारी मदतीखेरीज किंवा संरक्षणाविना चालू शकेल किंवा (२ ब) राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें त्याला मदत किंवा संरक्षण देणें इष्ट आहे आणि अशा संरक्षणाचा किंवा मदतीचा नागरिकांवरील बोजा अवास्तव होणार नाहीं, ह्या तीन कसोट्यांस उद्योगधंदा उतरला तर त्यास संरक्षण सुचविण्यांत यावयाचें होतें. सरकारचें जकातविषयक धोरण अद्याप पक्कें झालेलें नव्हतें. म्हणून, टॅरिफ बोर्डानें कमाल तीन वर्षांपेक्षां ज्यास्त मुदतीच्या संरक्षणाची शिफारस करावयाची नव्हती. ह्या बोर्डाकडे चौकशी-साठी ४९ अर्ज पाठविण्यांत आले. त्यांपैकी ४२ अर्जांवरील शिफारस टॅरिफ बोर्डानें १८ महिन्यांच्या आंतच केली.

### १९४७ च्या टॅरिफ बोर्डाकडे जादा कामें

आणखी दोन कामें सोपवून टॅरिफ बोर्डाची नोव्हेंबर, १९४७ मध्यें पुनर्घटना करण्यांत आली. तीं कामें अशीं:—(१) आयात मालाचे मानानें हिंदी मालाच्या उत्पादनखर्चांत वाढ कोणत्या कारणांमुळें होते, ह्याविषयीं सरकारास अहवाल सादर करणें आणि (२) कमींत कमी काटकसरीनें अंतर्गत संरक्षण कसें देतां येईल ह्याविषयीं शिफारस करणें. हीं कामें सरकारच्या मागणीप्रमाणें करावयाचीं होतीं. ३ वर्षांसाठी बोर्डाची नेमणूक करण्यांत आली. कांहीं उद्योगधंद्यांचे संरक्षणाचे नवे अर्ज बोर्डानें तपासले, तसेंच युद्ध-जन्य संरक्षित उद्योगधंद्यांचें (ज्यांचें संरक्षण १९४९ मध्यें बंद होणार होतें) संरक्षण चालू ठेवण्यासाठीं आलेले कांहीं अर्जहि बोर्डानें तपासले. किंमतीविषयक चार महत्त्वाच्या चौकशाहि बोर्डानें पुऱ्या केल्या. आतां सुमारें ४० उद्योगधंदे संरक्षण उपभोगीत आहेत. ज्यास्त ज्यास्त उद्योगधंद्रे संरक्षित धंद्यांच्या यादींत येऊं लागल्यामुळें, त्यांवर सतत लक्ष ठेवण्याची आवश्यकता सरकारास भासूं लागली आणि त्याप्रमाणें टॅरिफ बोर्डाकडेच हें काम सोंपविण्यांत आलें. संरक्षणाचा किंवा इतर मदतीचा उद्योगधंद्यांवर काय परिणाम होत आहे, ह्याचें निरीक्षण करून त्या संरक्षणांत किंवा मदतींत जरूर तीं दुरुस्ती सुचविण्याचीहि कामगिरी टॅरिफ बोर्डाकडे आली. त्याचप्रमाणें, हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या मालाच्या उत्पादन-खर्चाची चौकशी करणें, त्याची घाऊक व किरकोळ किंमत ठर-विणें, परदेशी माल येथील बाजारपेठांतून नुकसानकारक रीतीनें भरला गेल्यामुळें ( डंपिंग ) होणाऱ्या नुकसानीपासून हिंदी उद्योगधंद्यांचें संरक्षण करण्यासाठीं उपाय सुचविणें, ॲड व्हॅलोरम व स्पेसिफिक म्हणजे किंमतीवर व ऐनजिनसी घेण्यांत येणाऱ्या जकातींबाबत अभ्यास करणें, ट्रस्टस्—मोनॉपॉलीज सारख्या व्यापारास घातुक गोष्टींमुळें संरक्षित उद्योगधंद्यांचें नुकसान होऊं लागल्यास त्यांस आळा घालण्याचे मार्ग सुचविणें, हीं कामेंहि सरकारच्या वेळोवेळ इच्छेप्रमाणें बोर्डानें करावीं, असेंहि १९४८ च्या ऑगस्टमधील सरकारी हुकुमानें जाहीर केलें.

### फिस्कल कमिशनचे सभासद

हिंदुस्थान सरकारनें २० एप्रिल, १९४९ रोजीं नेमलेल्या फिस्कल कमिशनचे सभासद खालील प्रमाणें आहेत:—(१) श्री. व्ही. टी. कृष्णम्माचारियर (अध्यक्ष) (२) डॉ. बी. एन. गांगुली, (३) श्री. बी. एम. बिर्ला, (४) श्री. अनंत शयनम् अय्यंगार, (५) चौधरी मुख्तार सिंग, (६) श्री. खंडूभाई देसाई, (७) श्री. अंबालाल सारामाई आणि (८) श्री. डी. ए. मुजुमदार (सेक्रेटरी)

### टॅरिफ बोर्डाचे पांचवे सभासद

टॅरिफ बोर्डाचें काम वाढत चाललें आहे म्हणून, त्याच्या सध्याच्या चार सभासदांत आतां पांचव्याची भर घालण्यांत येत आहे. श्री. बी. एन. आडारकर ( सरकारचे डेप्युटी एकॉनॉमिक ॲडव्हायसर ) हे ते पांचवे सभासद होत.

### वाटेल तेवढें कापड घ्या; तलम मात्र नाहीं !

मुंबई प्रांतांतील जाड्याभरड्या व मध्यम प्रतीच्या कापड विक्रीवरील नियंत्रणें काढून घेतल्याचें गेल्या आठवड्यांत प्रांतिक सरकारनें जाहीर केलें. त्याचा अर्थ, हें कापड गिऱ्हाइकानें किती विकत घ्यावें, ह्यावर आतां बंधन नाहीं. किंमत मात्र नियंत्रित आहे. त्याचप्रमाणें, हें कापड सरकारमान्य दुकानांतूनच मिळणार आहे. इतर कोणताहि व्यापारी तें विक्रीस ठेवूं शकणार नाहीं. कापडाचें उत्पादन वाढलेलें नसलें तरी त्याचा उठाव होत नसल्या-कारणानें त्याचा साठा वाढत चालला आहे. सरकारनें दरमाणशीं कोटा वाढवून पाहिला आणि गोठविलेल्या कापड विक्रीस वेळेची व किंमतीची सवलत दिली, तरी गिऱ्हाइकांची मागणी वाढेना आणि कित्येकांनीं आपल्या कोट्याचें कापड अद्याप घेतलेलें नाहीं. तलम कापडास अजून मागणी असली तरी ती पूर्वीप्रमाणें नाहीं आणि त्यामुळें कापडाचें रेशनिंग रद्द होण्याचीं पूर्व-चिन्हें दिसूं लागलीं आहेत, असें बोलणें आतां ऐकूं येऊं लागलें आहे. गिऱ्हाइकांची कापड खरेदीची भूक आर्थिक परिस्थितीनें मारून टाकली असल्याकारणानें, कापड वाटेल तेवढें मिळूं लागणार असलें तरी त्याबद्दल फारसा उत्साह दिसत नाहीं.

### हिंद सायकल्स लि.

वरील कंपनीनें गेल्या वर्षाच्या नफ्यांतून दर भागास ५ रु. करमाफ डिव्हिडंड वांटलें.

### फुलें आणि केळीं

"मला स्वतःला फुलें अतिशय आवडतात, परंतु आज कोणत्याहि फुलापेक्षा केळ्यांचा घड माझ्या दृष्टीस ज्यास्त आल्हाद देतो."

पंडित जवाहरलाल नेहरू

## पौंडी गंगाजळीचें भवितव्य

### निर्गत वाढविण्याचें अगत्य

ब्रिटनकडून येणें असलेल्या शिलकांविषयीं बोलणीं करण्या- हिंदी व ब्रिटिश फडणवीस, डॉ. जॉन मथाई व सर स्ट्रॅफर्ड ह्यांच्या बैठकीस लवकरच प्रारंभ होईल. हिंदुस्थानास प्रमाणें पौंडी शिल्लक जेवढी मिळावयाची, त्या मानानें त्यानें पुष्कळच ज्यास्त केली आहे आणि १९५०–५१ मध्यें आंत आणावयाच्या पौंडांपैकी कांहीं पौंड आधीच वापरून आहेत. गेल्या जुलैमध्यें पौंडी शिलकांबाबत करार झाला, असून आतांपर्यंतचा ह्या शिलकांचा हिशेब खालीलप्रमाणें

| | |
|---|---|
| १९४८ मधील पौंडी शिल्लक | १,१५,००,००,००० पौंड |
| ब्रिटिश नोकरांच्या पेन्शन्सच्या खाते केले | १७,००,००,००० |
| हिंदुस्थानांतील युद्धसाहित्यासाठी दिले. | ४,५०,००,००० |
| पाकिस्तानचा हिस्सा | १८,६०,००,००० |
| बिन-व्यापारी घट | ४०,००,००,००० |
| १२ महिन्यांतील उचल | १०,००,००,००० |
| हिंदुस्थानच्या मालकीची पौंडी (सुमारें) | ६०,००,००,००० |

आकड्यांवरून दिसून येईल, कीं हिंदुस्थानाची पौंडी १२ महिन्यांपूर्वी जेवढी होती, तिच्या आतां तीं निम्यावर आहे. यंत्रसामुग्री वगैरेवर खर्च झाल्यामुळें ही शिल्लक कमी असती, तरें त्यांत आनंदच होता. कारण, त्यामुळें आपली शक्ति वाढणार होती. परंतु तसें फारसें घडलेलें नाहीं. ह्या वर्षांत ही शिल्लक फस्त होऊन जाईल. हिंदुस्थानानें असें देता, जरूर तेवढीच आयात करून शक्य ती निर्गत वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिंदुस्थानास डॉलरची हुंडणावळ कठीण जात आहे. त्यासाठीहि डॉलर क्षेत्राकडे निर्गत पाहिजे. परंतु, हिंदी मालाच्या उत्पादनाची किंमत भारी मुळें त्याचा डॉलर बाजारपेठेंत उठाव होणें अवघड झालें

---

### टेलिफोनची वरदळ कमी झाली

मध्यें टेलिफोनची मेसेज रेट पद्धति सुरू केल्यापासून रील बोलणीं ७५% कमी झालीं आहेत. व्यापारी वर्द- त्येक लाइनीवर दररोज पूर्वी ४२ कॉल्स व्हावयाचे, ते वर आले आहेत. रहात्या घरांच्या बाजूकडील कॉल्सची लाइनवर १९ होती, ती ५ वर आली आहे.

---

### कॉफीचें उत्पादन—कूर्ग व मद्रास अग्रेसर

–४८ मध्यें हिंदुस्थानांत एकूण १,९७,८२१ एकरांत लागवड झालेली होती. त्यांतून ३४० लक्ष पौंड कॉफी झाली. त्यापैकी मद्रासचा वाटा ६५ लक्ष पौंड, कूर्गचा पौंड, म्हैसूरचा १४४ लक्ष पौंड, कोचीनचा ३ लक्ष त्रावणकोरचा १ लक्ष पौंड होता.


खून साफ करनेमें मशहूर डॉ. वामन गोपाल का सार्सापरिला

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.






## 'नुकसानी सोसावी, का गिरणी बेकायदा बंद ठेवावी ?

### अहमदाबाद लेबर कोर्टाचा एक महत्त्वाचा निवाडा

भडोचच्या टेक्स्टाइल लेबर युनियननें अहमदाबाद लेबर कोर्टाकडे एक अर्ज केला. भडोच फाइन कौंटस स्पि. अँड वी. कं. लि. आणि इतर दोन गिरण्या ह्यांच्या चालकांनीं कांहीं महिन्यांपूर्वी गिरण्या बंद ठेवल्या, ही गोष्ट बेकायदा झाली असें ठरविण्यांत यावें, अशी अर्जदाराची मागणी होती. गिरण्यांना नुकसान येत होतें, असें चालकांचें म्हणणें होतें, म्हणून सरकारनें ऑक्टोबरमध्यें हें प्रकरण चौकशीसाठी कोर्टाकडे पाठविलें. चौकशी कोर्टाचें काम चालू असतांनाच, मिल एजंटांनीं एक नोटीस लावून १ एप्रिलपासून, कामांत नुकसान येतें म्हणून, गिरण्या बंद रहातील असें जाहीर केलें, आणि ७ मार्चपासून एक-एक प्राथमिक खातें बंद करण्यास प्रारंभ केला. ही गोष्ट बेकायदा बद्दल व बेकायदा काम बंद करणें ह्या दोन्ही सदरांत पडते, असें अर्जदाराचें म्हणणें होतें. "१९४४-४५ पासून गिरण्यांना नुकसान येत होतें म्हणून गेल्या ऑक्टोबरमध्यें दुसरी व तिसरी पाळी बंद ठेवली. ६ एप्रिल १९४९ पर्यंत चौकशी कोर्टाचें काम चाललें आणि त्यानंतर कोर्टाची पुढची कोणतीच तारीख ठरली नाहीं. गेल्या सप्टेंबर पासूनच गिरण्या बंद ठेवण्याचा कंपन्यांचा विचार होता; परंतु चौकशी कोर्ट नेमल्यामुळें नुकसान सोसूनहि गिरण्या चालू ठेवण्यांत आल्या. गिरण्या कायम नुकसानींत असल्यामुळें त्या बंद करणें कंपन्यांस भाग पडलें, त्यांत बेकायदा कांहीं नाहीं," असें कंपन्यांचें म्हणणें होतें.

"कंपन्यांनीं चौकशी कोर्टाचें अस्तित्वच नाहीं, असें मानल्यासारखें करून, सरकारला किंवा कोर्टाला न कळवितां गिरण्या एकाएकीं बंद केल्या. त्यामुळें, कामधंदा बुडालेल्या कामगारांची दुर्दशा काय वर्णावी ? उत्पादनवाढीची सर्वत्र घोषणा चालू असतांना गिरण्या बंद केल्यामुळें उत्पादनांत व्यत्यय आला, हाहि प्रश्न महत्त्वाचा आहे. कंपन्यांचा नुकसानीचा दावा विचारांत घेऊन नुकसानीचीं कारणें तपासण्यासाठी आणि तीन्ही पाळ्या चालविण्याचे मार्ग शोधण्यासाठी चौकशी कोर्टाची नेमणूक करण्यांत आली होती; परंतु त्याच्या रिपोर्टाची वाट न पहातांच, कंपन्यांनीं गिरण्या बंद केल्या, ह्याचा अर्थ कोर्टाचें अस्तित्वच अवमानलें गेलें. ज्यावेळीं कंपन्यांनीं गिरण्या बंद करण्याचें ठरविलें, त्यावेळीं परिस्थिति गिरण्या बंद करण्याइतकी गंभीर नव्हती. म्हणून, गिरण्या बॉंबे इंडस्ट्रिअल रिलेशन्स ॲक्टप्रमाणें बेकायदा बंद केल्या गेल्या, असें मी ठरवितों," असा अहमदाबाद लेबर कोर्टाचे जज्ज, श्री. व्यास ह्यांनीं निवाडा केला.

गिरण्या बंद ठेवल्याबद्दल व ही बंदी बेकायदा ठरविल्यानंतरहि ४८ तासांत गिरण्या पुनः चालू न केल्याबद्दल त्यांच्या चालकांवर कायदेशीर इलाज केला जाईल, असें समजतें.

---

**ऑस्ट्रेलिआंतील अमेरिकन एंजिनिअर्सचा तनखा**—ऑस्ट्रेलियांत १७,५०,००,००० पौंड खर्चून एक मोठें धरण बांधण्यांत येणार आहे. ह्या कामावर कांहीं अमेरिकन एंजिनिअर्स आहेत. ह्या एंजिनीअर्सचा सर्व तनखा डॉलर्सच्या नाण्यांत देण्यांत येणार नाहीं, असें ऑस्ट्रेलिआच्या मुख्य प्रधानांनीं जाहीर केलें आहे. तथापि त्यांच्या वेतनापैकीं कांहीं भाग अमेरिकेला पाठविण्याची परवानगी त्यांना देण्यांत येणार आहे.

## युरोपांत व ब्रिटनमध्यें डॉलरचा दुष्काळ

ग्रेट ब्रिटननें १९४९ च्या पहिल्या तिमाहींत एकूण जेवढी आयात केली, तिच्यापैकीं १०% अमेरिकेकडून, ८.५% कॅनडाकडून व १.५% इतर 'डॉलर' देशांकडून केली. ब्रिटनची निर्गत पाहिली, तर फक्त ३.५% निर्गत अमेरिकेकडे व ४.२५% निर्गत कॅनडाकडे झाली. ह्या आयाती–निर्गतीमधील तफावत अमेरिकन व कॅनेडियन देणग्या व कर्जें ह्यांनींच फक्त भरून येऊं शकेल. परंतु १९५२ नंतर मात्र ही तफावत प्रत्यक्ष निर्गतीनेंच भरून काढावी लागेल. हीच तर खरी अडचण आहे.

× × × ×

मार्शल मदत एका वर्षापूर्वी सुरू झाली, तेव्हां ब्रिटनजवळ सोनें व डॉलर्स मिळून ५५२ कोटी पौंडांचा रिझर्व्ह होता, तो मार्च अखेर ४७१ कोटी पौंडांवर आला व आतां तर तो ४० कोटी पौंडांवर येऊन ठेपला आहे. ह्या गतीनें, १८ महिन्यांत सर्व रिझर्व्ह खलास होऊन जाईल.

× × ×

खरी अडचण ब्रिटिश मालाच्या उत्पादन खर्चांतील वाढीची आहे. "थोडीशी बेकारी निर्माण झाली, म्हणजे आपोआप वैयक्तिक उत्पादन वाढेल" असें एकॉनॉमिस्ट ह्या साप्ताहिकानें सुचविलें आहे !

× × ×

ब्रिटिश पौंडाची किंमत उतरविण्याबद्दल आपणांवर अमेरिकेनें दडपण आणलेलें नाहीं, असें ब्रिटिश फडणविस, सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं कॉमन्स सभेंत जाहीर केलें.

× × ×

बेल्जम व अमेरिका ह्यांची अशी सूचना आहे, कीं ब्रिटनचें मार्शल मदत घेणाऱ्या युरोपियन देशांना जें देणें लागतें त्याचें सोन्यांत किंवा डॉलर्समध्यें रूपांतर करण्यास त्या देशांना मोकळीक असावी. ब्रिटनचा ह्याला विरोध आहे.

× × ×

मार्शल मदतीचा पाया युरोपांतील देशांची डॉलरविषयक व्यक्तिगत गरज हा आहे. परंतु त्याऐवजी युरोपांतील देशांच्या एकमेकांतील देण्यां-येण्यांतून निर्माण होणारी तफावत वर्ग करता यावी आणि तिचें डॉलर किंवा सोनें ह्यांत रूपांतर करतां यावें ही सूचना मान्य झाली तर मंजूर केलेल्या डॉलर्सचा मूळ योजनेप्रमाणें उपयोग केला जाईल अशी खात्री उरणार नाहीं. युरोपांतील देश एकमेकांशीं डॉलर मिळविण्यासाठी स्पर्धा करूं लागतील आणि त्यामुळें युरोपियन व्यापारास आळा बसेल, अशी ग्रेट ब्रिटनला भीति वाटत आहे.

---

**परदेशांत हिंदी मालाच्या 'शो रूम्स'**—हिंदी ग्रामोद्योगांतून तयार होणाऱ्या मालाकडे परदेशांतील गिऱ्हाइकांचें लक्ष वेधण्यासाठी अमेरिकेंतील न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहरांतून कायमच्या 'शो रूम्स' उघडण्याचा निर्णय हिंद सरकारनें घेतला आहे. युरोपांतही हीच व्यवस्था करण्यांत येणार आहे. हिंदी मालाची निर्यात वाढविण्यासाठी देशां-देशांतून भरणाऱ्या व्यापारी प्रदर्शनांत २५ व्यापारी कचेऱ्या उघडण्यांत आलेल्या आहेत. रोम, प्राग, ब्रुसेल्स, बर्न, बँकॉक, सिंगापूर, इत्यादि ठिकाणीं अशा कचेऱ्या नुकत्याच उघडण्यांत आल्या. हिंद सरकारच्या व्यापारी खात्यानें परदेशीय प्रदर्शनासाठी एक अधिकारी मुद्दाम नेमलेला आहे.

## मार्शल प्लॅन व युरोपचें पुनरुज्जीवन

(मा. म. काळे)

दुसऱ्या महायुद्धाची सर्वांत जास्त झळ युरोपखंडाला लागली व त्यामुळें १९४५ नंतर युरोपांतील बहुतेक देशांचें आर्थिक व औद्योगिक जीवन उध्वस्त झालें. आधुनिक उत्पादनाच्या साधनांचा व वाहतुकीच्या साधनांचा नाश बहुतेक सर्व देशांत झाला. कृषिविषयक उत्पादनालाहि बराच मोठा धक्का बसला. चलन-विस्तारामुळें आर्थिक जीवन दुःसह झालें होतें. परराष्ट्रीय व्यापारी संबंध नष्ट झाले होते व युरोपच्या (सोव्हिएट रशिया सोडून) आर्थिक पुनरुज्जीवनाची अपेक्षा बरीच कमी झाली होती.

परंतु अशाहि स्थितींत पश्चिम युरोपचा संघ व आर्थिक पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम यामुळें परस्पर सहकार्याच्या तत्त्वावर गेल्या दोन वर्षांत युरोपचें पुनरुज्जीवन शक्य झालें. पश्चिम युरोपियन राष्ट्रांचा गट व अटलांटिक करार या गोष्टी पश्चिम युरोपच्या जीवनांतील सहकार्याच्या निदर्शक आहेत. युरोपची १९४८ सालची आर्थिक पाहाणी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे त्यावरून भावी परिस्थिति आशाजनक आहे याबद्दल संशय नाहीं. कृषिविषयक उत्पादनांत १९३८ च्या मानानें अद्याप १० ते १५ टक्के घट आहे, परंतु औद्योगिक उत्पादन वाढत चाललें आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे उद्योगधंद्यांत गुंतविलें गेलेलें भांडवल १९३८ च्या मानानें २५ टक्क्यांनीं वाढलें आहे. मजूरवर्गाची उत्पादनशक्तिहि ९ टक्क्यांनीं वाढली आहे. औद्योगिक उत्पादनांत १६ टक्के वाढ झाली आहे. कोळसा व यंत्रसामुग्री यांची उणीव युद्धानंतर तीव्रतेनें भासत होती. परंतु याहि बाबतींत आतां सुधारणा झाली आहे. वस्तूंच्या किंमती आटोक्यांत ठेवणें हा एक महत्त्वाचा प्रश्न होता व बहुतेक देशांतून वस्तूंचे बाजारभाव शक्य तितके आटोक्यांत राखण्यांत आले होते. किंमती व मजुरांचे पगार यांत ५ टक्केच वाढ झाली. अंदाजपत्रकांची तोंडमिळवणी साधण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले.

अमेरिका व कॅनडा ह्या देशांकडे होणाऱ्या निर्यातींत वाढ झाली आहे व अमेरिकन मालाच्या आयातीचें प्रमाण बरेंच कमी झालें आहे. निर्गत व्यापारांत ३० टक्के वाढ व आयात व्यापारांत ६ टक्के घट १९३८ च्या मानानें शक्य झाली आहे. युरोपांतील निरनिराळ्या देशांत चालणारा व्यापार १९३८ च्या मानानें ३० टक्के कमी आहे, परंतु १९४७ च्या मानानें ह्या व्यापारांत २५ टक्के वाढ झाली आहे.

महायुद्धाचा विशेष परिणाम त्यांतल्या त्यांत इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, इटाली ह्या देशांना सोसावा लागला. बेल्जमवर युद्धाचा विशेष अनिष्ट परिणाम झाला नाहीं. बेल्जमचे बहुतेक उद्योगधंदे सुस्थितींत होते. बेल्जमला व्यापारी संबंधांमुळें दुर्मिळ चलन सहज मिळूं शकलें व त्यामुळें देशाची आर्थिक परिस्थिति सुधारण्यास विशेष मदत झाली. हॉलंडचें बरेंचसें नुकसान रेलवे रस्ते नादुरुस्त झाल्यामुळें, जहाजें बुडविलीं गेल्यामुळें व बरीचशी जमीन निरुपयोगी झाल्यामुळें झालें. बेल्जम व हॉलंड ह्या देशांची आर्थिक परिस्थिति इतर देशांनीं त्या देशांचा माल खरेदी करण्यावर विशेषतः अवलंबून आहे. फ्रान्सची परिस्थिति त्या देशाच्या अंतर्गत उत्पादनावर अवलंबून आहे. मार्शल योजनेनुसार मिळालेल्या मदतीमुळें १९४८ सालीं १९४७ ऑस्ट्रियाचें औद्योगिक उत्पादन १७५=१०० झालें, हॉलंडचें ११९, बेल्जमचें १०९, फ्रान्सचें ११४, इंग्लंडचें १११, डेन्मार्कचें १११, नॉर्वेचें १०९, व इटालीचें १०४, याप्रमाणें झालें. धान्याचें उत्पादन मात्र युद्ध-पूर्वीच्या काळाच्या मानानें १० टक्के कमी झालें.

युरोपच्या पुनरुज्जीवनाचें बारकाईनें निरीक्षण केल्यास असें दिसतें कीं मिळालेल्या यशाचें कारण चलनविस्तार, वस्तूंचे बाजारभाव व मजुरांचे पगार या सर्व गोष्टी आटोक्यांत ठेवल्या गेल्या व प्रत्येक देशानें आपणाला करतां येण्यासारखें उत्पादन वाढवून त्याच्या जोरावर परराष्ट्रीय चलन मिळविण्याचा प्रयत्न केला. हें करीत असतांना शासनसंस्थेची कार्यक्षमता व सामान्य जनतेची चिकाटी व प्रामाणिकपणा या गोष्टीहि महत्त्वाच्या आहेत. बदललेल्या परिस्थितीचें निरीक्षण करून इतरांशीं योग्य तें सहकार्य करण्याची वृत्तीहि उद्योगपतींमध्यें व तज्ज्ञांमध्यें दिसून येते.

एकंदर जगाच्या दृष्टीनें विचार केला असतां आधुनिक औद्योगिक उत्पादनाला आवश्यक अशा गोष्टी युरोपांतील देशांत एकत्रित झालेल्या दिसून येतात. जलवाहतुकीचा धंदा, यंत्रसामुग्रीची निपज, कांच सामान, फॅन्सी माल, उपयुक्त पोलादी माल, प्रवासी लोकांचा धंदा, कागद, जहाजें बांधणें व अनेक किरकोळ गोष्टी इत्यादींचें उत्पादन युरोपच्या देशांत शक्य होतें. त्या मालाचें उत्पादन व विक्री यांवर युरोपियन देशांची आर्थिक परिस्थिति अवलंबून आहे. अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया या देशांतील वाढत्या उत्पादनामुळें युरोपच्या पुनरुज्जीवनाच्या बाबतींत थोडीशी अडचण निर्माण होणें शक्य आहे. परंतु अजूनहि युरोपच्या कांहीं मालाचें वैशिष्ट्य अद्याप कायम आहे. यामुळें युरोपचें आर्थिक पुनरुज्जीवन शक्य आहे. लोकसंख्येची वाढ, जनतेच्या वाढत्या गरजा व राहाणीचें मान सुधारण्याची जनतेची इच्छा यांमुळें युरोपच्या मालाला व तज्ज्ञांच्या सल्ल्याला जगांतील देशांत मागणी कायम आहे.

इंग्लंड, फ्रान्स, युगोस्लाव्हिया, स्वीडन व हंगेरी या देशांत आर्थिक पुनरुज्जीवन विशेष भरीव स्वरूपांत झालें आहे. पण त्यांतल्या त्यांत इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांची प्रगति डोळ्यांत भरण्यासारखी आहे. १९४८ सालीं सर्व पश्चिम युरोपच्या देशांत जितकें औद्योगिक भांडवल उद्योगधंद्यांत गुंतविलें गेलें त्यापैकी निम्में भांडवल इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांत गुंतविलें गेलें आहे.

पश्चिम युरोपियन युद्धानंतरच्या इतिहासावरून हिंदला शिकण्यासारख्या गोष्टी म्हणजे प्रादेशिक परिस्थितीचा उत्पादनासाठी जास्तींत जास्त उपयोग व एकंदर व्यवहारांत चिकाटी व सचोटी ह्या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर इतर देशांशीं आर्थिक संबंध निर्माण करतां येतात.

पश्चिम युरोपियन राष्ट्रांची परिस्थिति सुधारत आहे. परंतु उत्पादनाच्या तंत्रामध्यें शक्य तितक्या नवीन सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. १९४८ सालीं समाधानकारक प्रगति झाली असली तरी ही प्रगति कायम टिकली पाहिजे व आर्थिक परिस्थिति पुष्कळशा देशांच्या बाबतींत जगांतील इतर देशांशीं त्यांना किती प्रमाणांत व्यापारी संबंध ठेवतां येतील यावर अवलंबून राहणार आहे. जगाच्या इतर भागांतील प्रगतीमुळें ही गोष्ट आतां पूर्वीइतकी सोपी राहिलेली नाहीं.

---

**मुंबई प्रांतांतील कॉलेजांना मदत**—प्रांतांतील कॉलेजांचा वाढता खर्च लक्षांत घेऊन मुंबई सरकारनें बिन-सरकारी आर्ट्स आणि सायन्स कॉलेजांसाठीं, १९४९-५० सालांत एकूण ६,१२,००० रुपये ग्रँट मंजूर केली आहे असें समजतें.

## दि को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, पुणें

एप्रिल, १९४९ मध्यें झालेल्या "हायर डिप्लोमा इन को-ऑपरेशन" ह्या लेखी परीक्षेचा निकाल., मिळालेला वर्ग व मार्क, ह्यांच्या अनुक्रमानें नांवें दिलीं आहेत.

**First Class**

Chauhan, M. J. 458, Walvekar, R. R. 449, Vaishnava, G. P. 448, Parekh, V. H. 447, Rana, R. T. 445, Koimattur, G. V. 431, Datar, G. R. 430, Purohit, B. B. 422.

**Second Class**

Shah, I. C. 419, Shah, P. H. 417, Pandya P. G. 413, Patel, A. M. 409, Joshi, K. G. 408, Wani, V. B. 400, Desai, K. D. 393, Mangoli, G. H. 387, Pathak, D. P. 384, Bhavnani, H. R. 380, Chaudhari, D. C. 378, Kale, V. Y. 377, Shridharani, G. R. 376, Raisinghani, J. R. 373, Patki, M. D. 369, Soman, M. G. 369, Patel, V. P. 367, Hiremath, G. V. 363, Nanivadekar, V. R. 363, Kotadia, N. T. 362, Takavekar, P. B. 362, Patel, S. D. 361, Pawar, F. D. 358, Barkati, M. H. 357, Raidurga, R. K. 355, Latkar, A. N. 354, Chinchalikar, S. K. 353.

**Pass Class**

Sondur, B. R. 349, Shah, C. A. 348, Patel, B. J. 344, Sali, S. V. 344, Chitale, G. D. 341, Bhende, S. S. 340, Hosamath, G. M. 339, Huli, B. C. 333, Desouza, J. A. 322, Bhorkar, U. K. 319.

**Pass**

Bhagwat, D. P. (With exemption in Book-keeping and Accounts & Advanced Accountancy and Auditing.)

Mangela, R. D. (With exemption in Co-operative and other laws.)

N. V. Nayak
*Principal.*

### जागतिक गहूं करारावर किमान आवश्यक तेवढ्या सह्या झाल्या

१ जुलै पूर्वी थोडा वेळ अगोदर आंतरराष्ट्रीय गहूं करारावर हिंदुस्थान, ग्रीस व लेबॅनॉन ह्यांनीं सह्या केल्यामुळें, तो करार आतां अमलांत आला आहे. एकूण खरेदीच्या ७०% गहूं आयात करणारांनीं करारास त्या तारखेपूर्वी, मान्यता दिली पाहिजे, अशी अट होती. १२ इतर देशांनीं ह्यापूर्वींच करारावर सही केली होती. आतां एकूण खरेदीच्या ७४·७% गहूं आयात करणाऱ्या देशांच्या सह्या झाल्या आहेत. ह्या सर्व १६ देशांनीं मिळून ४ वर्षेपर्यंत दरसाल २४,०९,०८,०४० बुशेल गहूं विकत घेण्याचें मान्य केलें आहे.

एकूण गव्हाच्या निर्गतीपैकीं ८०% विक्री करणाऱ्या देशांची करारास मान्यता हवी, ही अटहि अमेरिका व कॅनडा ह्यांच्या सहीनें मागेंच पुरी झाली होती. ३० जून रोजीं आतां ऑस्ट्रेलियानेंहि सही केली आहे. कराराच्या अंमलबजावणीची व्यवस्था करण्यासाठी इंटरनॅशनल व्हीट कौन्सिलची बैठक ५ जुलै रोजीं सुरू झाली.

### कोऑपरेशन अँड अकौन्टन्सी डिप्लोमा

वरील परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची यादी "अर्था" च्या २२ जूनच्या अंकांत प्रसिद्ध झाली होती. तिचेमधील "आर. एम. हेहगे" ह्या नांवाऐवजीं "आर. एम. हेगडे" असें नांव पाहिजे.


## बांठीया बँक लिमिटेड

पनवेल (कुलाबा)

स्थापना १९४३

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. ४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

मुंबईः—६५-६७ झव्हेरी बझार. बेलापूररोडः—पोस्टासमोर पुणेंः—१२६८ भवानी पेठ. कल्याणः—शिवाजी चौक. अहमदनगरः—बझार पेठ. भिवंडीः—बझार पेठ

चेअरमनः—श्री. रतनचंद भिकमदास बांठीया

मॅनेजिंग डिरेक्टरः—श्री. विरदीचंद भूरचंद बांठीया.

*डायरेक्टर्सः*—श्री. केशरचंद आनंदराम बांठीया, श्री. गंगाधर विष्णु पुराणिक, श्री. सिवराज आनंदराम बांठीया, श्री. रावजी भिमजी रंगपरीया. (ऑ. मॅजिस्ट्रेट), श्री. केशव गोविंद लिमये, बी. ए., एलएल. बी., श्री. जे. एस्. कासद, बी. कॉम., श्री. चुनिलाल जसरूप मुनोथ., श्री. सोराबजी रुस्तोमजी घासवाला.

जनरल मॅनेजरः—श्री. गणेश भैरव साठे.

*बँकिंगचीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. विशेष माहितीसाठीं समक्ष भेटा अगर लिहा.*

आर. पी. जोशी, B. A., Cert. A. I. B.
मॅनेजर.

## कूळ व शेत-जमीन कायदा

१९४८

प्रसिद्ध झाला. साधी बांधणी किं. ४ रु.; उत्तम कागद व बांधणी ५ रु; कूळकायदा (१९३९) तिसरी आवृत्ति किं. २ रु.; दोन्ही कूळ कायदा सवलतीची किंमत साधी बांधणी ५ रु. व मजबूत बांधणी ६ रु.; मुंबई सावकारी कायदा किं. २॥ रु.; शेतकरी कर्जनिवारण कायदा किं. ४ व ४॥ रु.; घरभाडें नियंत्रण कायदा किं. २ रु.; द्विभार्याप्रतिबंधक कायदा दुसरी आवृत्ति, किं. १ रु.; हिंदु घटस्फोट कायदा किं. १ रु.

नवीन कूळ कायद्याप्रमाणेंच्या खंडाच्या पावत्या. २५ पावत्यांच्या पुस्तकास ८ आणे.

पत्ता— लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २.

## नवीन पुष्कळ निघाले, तरी तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.


हें पत्र पुणें, पेट भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.